डोळ्यांत अश्रू, ओठांवर आभार... गुरुंना दिला कृतज्ञतेचा मुजरा >> पान 2

दिग्रस येथील हिंदू-मुस्लीम ऐक्य इतर गाव-शहरांसाठी आदर्शवत व प्रेरणादायी- तहसीलदार मयूर राऊत >> पान 3

राजलक्ष्मी अर्बन महिला पतसंस्थेचे भव्य उद्घाटन >> पान 4

**सुविचार**

संयम आणि धैर्य यशाचे मुख्य घटक आहेत.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 47 ■ मंगळवार, दि. 09 सप्टेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




अहान पांडे आणि अनित पड्डा स्टारर सैयारा होईल या दिवशी ओटीटीवर प्रदर्शित

आतील पान

# १७ सप्टेंबरआधी कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरु करा

## पुन्हा मोठा निर्णय घ्यावा लागेल; मनोज जरांगेंचा सरकारला इशारा



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी: मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली आझाद मैदानावर झालेल्या आंदोलनानंतर राज्य सरकारने मराठा आरक्षणासंदर्भात एक शासन आदेश जारी केला होता. या आदेशामध्ये हैदराबाद गॅझेटियर लागू करण्यासोबतच पात्र मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुलभ करण्यात आली. मात्र, सरकारच्या या निर्णयामुळे ओबीसी समाजामध्ये नाराजी पसरली आहे. या पार्श्वभूमीवर आता मंत्री छगन भुजबळ यांनी या शासन आदेशाविरोधात आक्रमक भूमिका घेत, सरकारविरोधात थेट न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या दोन दिवसांत छगन भुजबळ मुंबई उच्च न्यायालयात मराठा समाजासाठी काढलेल्या जीआरविरोधात याचिका दाखल करणार आहेत. यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी पत्रकार परिषद घेत जोरदार हल्लाबोल केलाय. १७ सप्टेंबरआधी कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरु करा, अन्यथा पुन्हा मोठा निर्णय घ्यावा लागेल, असा इशारा त्यांनी सरकारला दिलाय.**

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, गरिबांनी जीआर काढला, हैदराबाद प्रमाणपत्र देण्यात यावे तर अर्धा महाराष्ट्र पागल झाला. काही अभ्यासक देखील पागल झाले. म्हणजे गरीबाच्या लेकरांनी किती मजबूत जीआर काढलेला आहे. आमच्या विरोधातले काही लोक तर इतके पागल झाले आहेत की, त्यांना झोपाच येईना. मराठवाडा १०० टक्के आरक्षणात जाणार आहे. मराठ्यांनी टेन्शन घेण्याची गरज नाही. पण माझा मराठ्यांना एक सल्ला आहे की, विजय पचवता आला पाहिजे आणि पराजय सुद्धा पचवता आला पाहिजे, थोडं संयमाने घ्या, असे त्यांनी म्हटले.


मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले की, हैदराबाद गॅझेटियरची तातडीने अंमलबजावणी करून नोंदी केल्या नाही तर येत्या दसऱ्या मेळाव्यात आम्हाला सरकारच्या विरोधात आमची भूमिका जाहीर करावी लागणार आहे. फडणवीस साहेब, शिंदे साहेब, अजितदादा, विखे साहेबांनी सांगितले आहे की आम्ही हैदराबाद गॅझेटियर लागू केले आहे. मग आता १७ सप्टेंबरच्या आत मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या आत याची अंमलबजावणी सुरू झाली पाहिजे. प्रत्येक गावातील नोंद नसलेल्या मराठ्याला हैदराबाद गॅझेटियरच्या नोंदीच्या आधारे कुणबी प्रमाणपत्र देण्याची सुरुवात करा. जर अंमलबजावणी सुरू झाली नाही तर येत्या दसरा मेळाव्याला सरकारला कळेल की आता सरकारची बितली, असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

मला शंभर टक्के खात्री आहे की, सरकार आता मराठ्यांच्या अपमान करणार नाहीत आणि हैदराबाद गॅझेटच्या नोंदीच्या आधारे मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देतील. मराठे शंभर टक्के जिंकलेले आहेत. आपण खूप मोठी लढाई मुंबईतून जिंकून आलेलो आहोत. जीआरमध्ये काही बदलायचे असेल तर ते सरकारने बदलायचे. आम्हाला प्रमाणपत्र पाहिजे आहे. बाकीचे नाटक बंद करा. त्याच्यात काही शब्द चुकलेला असेल तर तो सरकारने बदलावा. तुम्ही आम्हाला व्यासपीठावर सांगितले की, आम्ही हैदराबाद गॅझेटियरचा जीआर काढतोय. मुख्यमंत्र्यांनी देखील सांगितलं की आम्ही हैदराबाद गॅझेटियर लागू केलं. आता आम्हाला त्या नोंदीच्या आधारे प्रमाणपत्र हवे आहे. जर कोणाचेही ऐकून थोडं जरी इकडे-तिकडे केले. त्या येवल्यावाल्याचे (छगन भुजबळ) ऐकून जीआरमध्ये हेराफेरी केली तर १९९४ चा जीआर आम्हीदेखील चॅलेंज करू आणि तो सुद्धा रद्द करावा लागणार आहे. तुम्ही जर आमच्या मुळावर उठणार असाल तर आम्ही देखील तुमच्या मुळावर उठू, असे देखील मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

छगन भुजबळ मराठा आरक्षणाच्या विरोधात कोर्टात जाणार आहेत. याबाबत विचारले असता मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आमचे उठ चॅलेंज होणार नाही. मात्र तुमचे आरक्षण उडणार आहे. ९४ चे आरक्षण उडवून आमचे आम्हाला आरक्षण द्या. आमच्या उठला खोड करून अडचणी आणल्यास महाराष्ट्रात यांना येऊ देणार नाही. देवेंद्र फडणवीस मराठ्यांचा रोष घेणार नाहीत, असे त्यांनी म्हटले.

# सरकारच्या मराठा आरक्षणाच्या जीआर विरोधात छगन भुजबळ कोर्टात जाणार

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी:** मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली आझाद मैदानावर करण्यात आलेल्या आंदोलनानंतर राज्य सरकारने मराठा आरक्षणासंदर्भात शासन आदेश काढला होता. यामध्ये हैदराबाद गॅझेटियर लागू करण्यासोबत पात्र मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळण्याची प्रक्रिया सोपी करण्यात आली होती. सरकारच्या या जीआरमुळे ओबीसी समाज नाराज झाला होता. या पार्श्वभूमीवर आता मंत्री छगन भुजबळ यांनी या जीआरविरोधात दंड थोपटत सरकारलाच न्यायालयात खेचण्याचे ठरवले आहे. छगन भुजबळ यांच्याकडून येत्या दोन दिवसांमध्ये मुंबई उच्च न्यायालयात मराठा समाजासाठी काढण्यात आलेल्या जीआर विरोधात याचिका दाखल केली जाणार आहे.

छगन भुजबळ हे सर्व ओबीसी नेत्यांच्यावतीने उच्च न्यायालयात ही याचिका दाखल करणार आहेत. गेल्या चार दिवसांपासून छगन भुजबळ यांची विविध वकिलांसोबत चर्चा सुरु आहे. न्यायालयात याचिका दाखल करण्यासाठी ओबीसी समाजाकडून कागदपत्रांची जुळणी सुरु होती. ही कागदपत्रे जमा झाल्यानंतर आता छगन भुजबळ हे न्यायालयात मराठा आरक्षणाच्या नव्या शासन आदेशाविरोधात दाद मागणार आहेत. येत्या दोन दिवसांमध्ये छगन भुजबळ हे हायकोर्टात याचिका दाखल करतील, अशी माहिती आहे. समीर भुजबळ हे या कायदेशीर लढाईची जबाबदारी सांभाळणार आहेत. मराठा समाजाने देखील ओबीसी समाज कोर्टात जाण्याची बाब लक्षात घेत आधीच कॅव्हेट दाखल केले आहे. मनोज जरांगे यांचे निकटवर्तीय गंगाधर काळकुटे यांच्यावतीने ही कॅव्हेट याचिका दाखल करण्यात आली होती. छगन भुजबळ हे आता न्यायालयात जाणार असल्याने मनोज जरांगे पाटील आणि मराठा आंदोलक काय बोलणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मराठा उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील आणि महायुतीच्या मंत्र्यांनी मनोज जरांगे यांची आझाद मैदानात जाऊन भेट घेतली होती. त्यांच्याशी वाटाघाटी केल्यानंतर राज्य सरकारने मराठा आरक्षणाचा जीआर काढला होता. यानंतर छगन भुजबळ प्रचंड नाराज झाले होते. या निर्णयानंतर छगन भुजबळ हे राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीलाही उपस्थित राहिले नव्हते. त्यामुळे छगन भुजबळ यांच्या नाराजीच्या चर्चा रंगल्या होत्या. राज्य सरकारच्या नव्या जीआरमुळे संपूर्ण मराठा समाज ओबीसीमध्ये येईल, असा दावा मनोज जरांगे पाटील यांनी केला होता. मात्र, आता छगन भुजबळ यांनी या जीआरला न्यायालयात आव्हान दिल्याने आता पुढे काय घडणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

## पितृपक्ष, उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक अनब सावधगिरीचा इशारा; राऊत भाजपचं नाव घेत स्पष्टच म्हणाले...

**मुंबई/प्रतिनिधी:** देशाच्या उपराष्ट्रपतीपदासाठीच्या निवडणुकीसाठी एनडीए आणि इंडिया आघाडीकडून जोरदार तयारी सुरू असून सोमवार ८ सप्टेंबर २०२५ रोजी या निवडणुकीची रंगीत तालिम पार पडणार आहे. तिथं एनडीएचं या निवडणुकीच्या धर्तीवर प्रशिक्षण पार पडलेलं असताना इथं इंडिया आघाडीकडून मॉक पोल पार पडणार आहे. या संपूर्ण राजकीय स्थितीवर आणि उपराष्ट्रपतीपदासाठीच्या निवडणुकीच्या एकंदर तयारीवर शिवसेना ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी काहीशी उपरोधिक प्रतिक्रिया दिली.

उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक त्यांनी पितृपक्षात घेतली. त्याच्यामुळं भारतीय जनता पक्ष हा धर्मनिरपेक्ष झाला आणि मुहूर्त, पंचांग पाहत नाही त्यांनी दाखवून दिलं याबद्दल त्यांचं अभिनंदन. नाहीतर, मुहूर्त पाहणा, पंचांग पाहणार, तिथी पाहणार हे त्यांचं सुरूच असतं. यावेळी १० वर्षांमध्ये पहिल्यांदाच भाजपनं स्वतःला धर्मनिरपेक्ष घोषित केल्यासारखं वाटत आहे.'नवीन निवडून येणाऱ्या उपराष्ट्रपतींनी सावध राहायला पाहिजे. कारण, आधीच्या उपराष्ट्रपतींचं काय झालं हे कळायला मार्ग नाही. कारण, जोपर्यंत त्यांचं, जगदीप धनखड यांचं सार्वजनिक दर्शन होत नाही तोपर्यंत ते गायब आहेत. त्यांच्याविषयी शंका कायम राहतील. त्यामुळं येणाऱ्या राष्ट्रपतींना आधीच्या उपराष्ट्रपतींनी नेमक्या काय चुका केल्या हे पाहावं लागेल.

# डाळींमध्ये भारत जागतिक आघाडीवर

## नीती आयोगाचा अहवाल प्रसिद्ध

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** डाळींच्या क्षेत्र आणि उत्पादनात भारत अजूनही जगात अग्रेसर आहे. त्याचवेळी, देशातील उत्पादन क्षमतेत सुधारणा करण्यासाठी अजूनही भरपूर वाव आहे. नीती आयोगाने नुकतेच यासंदर्भात एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यानुसार, जागतिक स्तरावर डाळींचे उत्पादन ३ टक्के वार्षिक वाढीच्या दराने वाढत आहे, ज्यामध्ये सुमारे ७५ टक्के उत्पादन विकसनशील देशांमधून येते आणि आशियाचा वाटा ४४ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. २०२२ मध्ये, जागतिक डाळींच्या लागवडीचे क्षेत्र ९७.०९ दशलक्ष हेक्टर होते आणि उत्पादन ९६.०४ दशलक्ष टन होते, तर उत्पादकता ०.९८९ टन/हेक्टर होती.

नीती आयोगाचे सदस्य प्रा. रमेश चंद, सीईओ बी.व्ही.आर. सुब्रह्मण्यम आणि इतर वरिष्ठ अधिकारी यांनी नवी दिल्लीत 'स्वयंपूर्णतेच्या ध्येयाकडे डाळींच्या वाढीला गती देण्यासाठी धोरणे आणि मार्ग' या शीर्षकाचा अहवाल प्रकाशित केला. या अहवालात भारतातील डाळींचे उत्पादन वाढविण्यासाठी, स्वयंपूर्णता प्राप्त करण्यासाठी आणि भविष्यात मागणी पूर्ण करण्यासाठी धोरणे आणि मार्गदर्शक उपाययोजनांचे तपशीलवार विश्लेषण सादर केले आहे.



या अहवालानुसार, सुके शेंगदाणे, हरभरा, तूर, मसूर आणि वाटाणे या प्रमुख डाळी आहेत. गेल्या पाच वर्षांत, सुके शेंगदाणे ३५.९७ दशलक्ष हेक्टर क्षेत्र आणि २७.४२ मेट्रिक टन उत्पादनासह यादीत अव्वल स्थानावर होते, जरी त्याचे उत्पादन ०.७७४ टन/हेक्टर आहे. दुसरीकडे, वाटाण्याचे सर्वाधिक उत्पादन १.९ टन/हेक्टर आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा डाळी उत्पादक देश आहे.

भारतात डाळींचा वापरही वाढत आहे. २०२२-२३ मध्ये दरडोई वापर १७.१९ किलो/वर्ष होता, जो आयसीएमआर-एनआयएनने सुचवलेल्या १४ टक्के दैनिक ऊर्जेच्या पातळीपेक्षा कमी आहे. शहरी भागात तयार उत्पादनांचा वापर जास्त आहे, तर ग्रामीण भागात तूर आणि इतर पारंपरिक डाळींचा वापर जास्त आहे. जागतिक व्यापारात भारत एक प्रमुख आयातदार आहे. २०२३-२४ मध्ये, देशाने ४.७३९ मेट्रिक टन डाळी आयात केल्या, ज्यामध्ये लाल मसूर, पिवळे वाटाणे आणि उडीद हे प्रमुख होते. याउलट, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि रशिया हे प्रमुख निर्यातदार आहेत.

# ई-वॉटर टॅक्सीची धमाकेदार एंट्री

## गेटवे ते जेएनपीए फक्त ४० मिनिटांत! २२ सप्टेंबरपासून होणार सुरु

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** मुंबईकरांसाठी आनंदाची बातमी! देशातील पहिली पर्यावरणपूरक आणि अत्याधुनिक सोयींनी सज्ज ई-वॉटर टॅक्सी आता सेवेत दाखल होत आहे. गेटवे ऑफ इंडिया ते जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीए) हा प्रवास आता अधिक सोयीस्कर आणि झपाट्याने होणार आहे. सध्या या मार्गावर लाकडी बोटींमधून प्रवास करताना सुमारे एक तास किंवा त्याहून अधिक वेळ लागत असे. पण, ई-वॉटर टॅक्सीमुळे हा प्रवास फक्त ४० मिनिटांत पूर्ण होणार आहे. प्रवाशांसोबतच जेएनपीएचे कर्मचारीदेखील या आधुनिक जलवाहतुकीचा लाभ घेणार आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, येत्या २२ सप्टेंबरपासून दोन ई-वॉटर टॅक्सी गेटवे ऑफ इंडिया ते जेएनपीएदरम्यान धावणार आहेत.

सध्या गेटवे ऑफ इंडिया ते जेएनपीएदरम्यान प्रवासासाठी लाकडी बोटींचा वापर केला जातो. मात्र या बोटी जुना झाल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत नेहमीच प्रश्नचिन्ह निर्माण होते. याशिवाय, या बोटींमधून प्रवास करताना किमान एक तास लागतो, तर हवामान बिघडल्यास किंवा तांत्रिक बिघाड झाल्यास हा वेळ आणखी वाढतो. त्यामुळेच जेएनपीएने अधिक सुरक्षित, पर्यावरणपूरक आणि आधुनिक पर्याय म्हणून ई-वॉटर टॅक्सी सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला. या नव्या सेवेमुळे प्रवासाचा वेळ तब्बल २० मिनिटांनी कमी होऊन केवळ ४० मिनिटांत गेटवे ते जेएनपीए प्रवास शक्य होणार आहे.



ई-वॉटर टॅक्सी सेवेमुळे मुंबईकरांना प्रवासासाठी आणखी एक वेगळा आणि किफायतशीर पर्याय उपलब्ध होणार आहे. यामध्ये खास बाब म्हणजे ही वॉटर टॅक्सी परदेशातून आयात केलेली नसून, पूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानाच्या आधारे माझगाव डॉक शिपबिल्डिंग लिमिटेड (एमडीएल) यांनी तयार केली आहे. त्यामुळे ही सेवा केवळ पर्यावरणपूरक नाही तर 'मेक इन इंडिया' मोहिमेचं उत्तम उदाहरणही ठरणार आहे.

ई-वॉटर टॅक्सी सेवेबाबत समोर आलेल्या माहितीनुसार, भारतात तयार झालेल्या या दोन टॅक्सींपैकी एक सौरऊर्जेवर तर दुसरी विजेवर धावणार आहे. या दोन्ही टॅक्सी आधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज असून प्रत्येकीत २० प्रवाशांची क्षमता आहे. गेटवे ऑफ इंडिया ते जेएनपीए दरम्यान या सेवेचा लाभ घेण्यासाठी प्रवाशांना सुमारे १०० रुपये इतकं भाडं मोजावं लागणार आहे. या ई-वॉटर टॅक्सींचे नियमित संचालन आणि देखभालीची जबाबदारी 'भारत फ्रेट ग्रुप'कडे सोपवण्यात आली आहे.

भारत फ्रेट ग्रुपचे मालक सोहेल काझानी यांनी माहिती दिली की, सध्या जेट्टीवर चार्जिंग स्टेशन उभारणीचे काम वेगाने सुरू आहे. हे काम वेळेत पूर्ण झाल्यानंतर पहिल्याच दिवशी प्रवाशांना ई-वॉटर टॅक्सीची सेवा कोणत्याही अडथळ्याशिवाय उपलब्ध होणार आहे. याशिवाय, पुढील टप्प्यात चार हायड्रोजनवर चालणाऱ्या बोटी सेवेत दाखल करण्याचीही तयारी सुरू आहे. या उपक्रमामुळे प्रवाशांची संख्या वाढेल आणि प्रदूषणमुक्त, पर्यावरणपूरक प्रवासाचा नवा आदर्श निर्माण होईल.

## बीडमध्ये चाललंय काय? कलेक्टरच्या आदेशाला केराची टोपली, पोलीस ठाण्यासमोरच बॅनरवर झळकला वाल्मिक कराडचा फोटो

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी:** बीड जिल्ह्यात अनाधिकृत बॅनर आणि गुन्हेगारांचे फोटो लावण्यावर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी १० ऑगस्ट रोजी बंदी घातली होती. मात्र, परळी शहरात या आदेशाचे सर्रास उल्लंघन झाल्याचे दिसत आहे. परळी शहरातील दोन्ही पोलीस ठाण्यासमोर धक्कादायक प्रकार समोर आला आहे. त्यामुळे आता बीडमध्ये कायद्याचं राज्य राहिलंय की नाही? असा सवाल विचारला जात आहे.

वाल्मीक कराडचा बॅनरवर फोटो

परळी शहरातील दोन्ही पोलीस ठाण्यासमोर आणि नगर परिषदेच्या अगदी जवळच लावलेल्या बॅनरवर एका गुन्हेगाराचा फोटो झळकला आहे. सरपंच संतोष देशमुख हत्याकांडातील मुख्य आरोपी वाल्मीक कराडचा फोटो ईद-ए-मिलादच्या शुभेच्छा देणाऱ्या आणि स्वागतासाठी लावलेल्या बॅनरवर दिसून आला आहे. या बॅनरवर राष्ट्रवादी काँग्रेस युवक नेता असा उल्लेख असून, त्यात आमदार धनंजय मुंडे यांचाही फोटो आहे.

कायद्याचं राज्य आहे की नाही?

पोलिसांच्या आणि नगर परिषदेच्या समोरच हे बॅनर लावण्यात आल्याने आता जिल्हाधिकारी प्रशासन यावर काय कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. बीडमध्ये आता कायद्याचं राज्य आहे की नाही? असा सवाल उपस्थित केला जाऊ लागला आहे. तसेच बीड जिल्ह्यातील मांजरसुंबा चौकात लक्ष्मण हक्के यांच्या समर्थकांनी संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड यांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी केल्याची माहिती देखील समोर आली होती.

## साक्षरतेचे प्रमाण वाढण्याची गरज

कालचा दिवस म्हणजे ८ सप्टेंबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक साक्षरता दिन म्हणून साजरा केला गेला. मानवी समाज सुसंस्कृत बनून समाजाचे शिक्षणाच्या जोरावर मानवी कल्याण होऊन सर्वांना विकासाच्या समान संधी उपलब्ध व्हाव्यात. ज्ञानी लोकांपासून अज्ञानी लोकांची होणारी पिळवणूक, फसवणूक, शोषण आदीपासून मुक्तता व्हावी. निरक्षर लोकांना साक्षरतेची संधी मिळावी यासाठी राष्ट्रकुलच्या युनेस्को या संघटनेने १९६५ साली जागतिक पातळीवर साक्षरता दिन साजरा करण्याची घोषणा केली व त्याच्या पुढच्या वर्षापासून ८ सप्टेंबरला जगभर ती प्रथा रूढ झाली. आज इतक्या वर्षांनंतरही युनेस्कोने सुरू केलेल्या जागतिक साक्षरता दिनाला जगभर प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. युनेस्कोच्या व्याख्येनुसार साक्षरता म्हणजे माणसाला दैनिक जीवनाशी निगडित बाबीविषयी लिहिता वाचता येणे, मानवी जीवनातील घडामोडींचे विश्लेषण करता येणे व वैयक्तिक स्वातंत्र्य अबाधित ठेवून स्वतः च्या व समाजाच्या प्रगतीस हातभार लावणे. शिक्षणाचे महत्व कोणाला नाही? मानवी कल्याणासाठी शिक्षण अतिशय महत्वाचे आहे मात्र केवळ शिक्षण देणे म्हणजेच साक्षरता नव्हे तर मानवी प्रगतीच्या वाट्यात अडथळा बनण्याचा, गरिबीला नष्ट करण्याचा तो एक वैशिष्ट्यपूर्ण आणि शक्तिशाली मार्ग आहे. जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि समाज बदलवण्यासाठी साक्षरता एक परिणामकारक साधन आहे म्हणूनच युनेस्कोने जगभर साक्षरता अभियान राबवले. युनेस्कोने सुरू केलेल्या या साक्षरता अभियानाला जगभर चांगला प्रतिसाद मिळाला. भारतात सुद्धा या अभियानाचे चांगले फलित दिसून आले असून, एका आकडेवारीनुसार १९४७ साली भारत स्वातंत्र्य झाला तेंव्हा भारताचा साक्षरता दर हा १२ टक्के इतकाच होता. १९९१ मध्ये साक्षरतेचे हे प्रमाण ५२ टक्क्यांवर आले तर २०११ मध्ये ते ७५.०६ वर पोहचले. पण आपला देश अजूनही १०० टक्के साक्षर नाही. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाली तरी १०० टक्के साक्षरता आपण साध्य करु शकलो नाही. उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, ओडिशा, बिहार या उत्तरेकडील राज्यात अजूनही साक्षरतेचे प्रमाण समाधानकारक नाही त्यामानाने केरळसह दक्षिणेकडील सर्व राज्यात मात्र साक्षरतेचे प्रमाण समाधानकारक आहे. देशातील साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी शासकीय पातळीवर विविध उपक्रम राबवले जात आहेत. सर्व शिक्षा अभियान, समग्र शिक्षा अभियान, मध्यान भोजन योजना, प्रौढ शिक्षण योजना, राजीव गांधी साक्षरता अभियान, नवभारत साक्षरता अभियान या सारखे उपक्रम राबवून सरकार देशातील साक्षरतेचा टक्का वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. या सर्व उपक्रमांना चांगला प्रतिसादही मिळत असल्याने लवकरच आपण १०० टक्के साक्षरतेचे उद्दिष्ट साध्य करू. जागतिक साक्षरता दिनाच्या आपल्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

# डोळ्यांत अश्रू, ओठांवर आभार... गुरुंना दिला कृतज्ञतेचा मुजरा

## नायगांव दत्तापुरमध्ये शिक्षक दिनी पार पडला सेवापूर्ती व नागरी सत्कार समारंभ, शेकडो माजी विद्यार्थ्यांची उपस्थिती भावनिक ठरली

**दैनिक आपला विदर्भ**

**नायगांव दत्तापुर/प्रतिनिधी:** शिक्षक या शब्दामध्ये संपूर्ण समाजाचा पाया दडलेला असतो. समाज घडवणाऱ्या, माणसं घडवणाऱ्या या ज्ञानदीपांचा गौरव करणे म्हणजे आपल्या संस्कृतीचाच सन्मान करणे. अशीच एक कृतज्ञतेने ओथंबलेली, भावनांनी भरलेली, आणि प्रेमाने नटलेली सकाळ नायगांव दत्तापुर या गावाने शिक्षक दिनाच्या शुभदिनी अनुभवली.

आयाजी परसाजी पाटील विद्यालय येथील उपप्राचार्य प्रा. मधुकर तोताराम शेळके सर यांच्यासह अन्य सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा सेवापूर्ती व नागरी सत्कार समारंभ गावातील नागरिक, माजी विद्यार्थी आणि विविध मान्यवरांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहात पार पडला.

**गुरूंना अर्पण केले**

**कृतज्ञतेचे शब्द...**

या कार्यक्रमात शेकडो माजी विद्यार्थी, गावकरी, शिक्षक व मान्यवर उपस्थित होते. आपल्या आयुष्याच्या वाटचालीत मार्गदर्शन करणारे शिक्षक आता सेवानिवृत्त होत आहेत, ही भावना अनेकांच्या डोळ्यांत अश्रू घेऊन आली. मात्र, त्यांच्या समर्पित सेवेचा गौरव करताना सर्वांच्या चेहऱ्यावर गर्वाचे तेज झळकत होते.

सत्कारप्रसंगी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह आणि भेटवस्तू देऊन सपत्नीक सन्मान करण्यात आला. सत्काराच्या क्षणी प्रा. शेळके सर गहिवरून गेले, आणि उपस्थितांचे डोळेही पाणावले.

**मान्यवरांचे मार्गदर्शन आणि गौरवोद्गार**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ रहाटे होते. प्रमुख अतिथी म्हणून सरपंच विलासराव गवई, संचालिका सौ. पुष्पाताई रहाटे, प्राचार्य भगत सर,



तंटामुक्ती अध्यक्ष गजानन पाटील निकम, माजी प्राचार्य टी.बी. धोंडगे सर, पी.ई. ठोकरे सर, पोलिस पाटील शिवाजीराव शेळके, प्रा. शिवराम बावस्कर, प्रा. आर.ओ. रहाटे, प्रा. पी.आर. आसोले, प्रा. के.एस. इंगोले, धनदर सर, घगे सर, घायाळ सर, डि.एम. निकम सर आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**भावना ओतप्रोत भरलेल्या क्षणांची साक्ष...**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. रमेश नालेगांवकर सर यांनी करत आयोजनाचे सविस्तर वर्णन दिले. टी.बी. धोंडगे सर, पी.ई. ठोकरे सर, प्रा. आर.ओ. रहाटे, प्रा. शिवराम बावस्कर, संतोष नरवाडे, गजानन भगत सर, मंगेश पागोरे साहेब यांनी आपल्या भाषणातून प्रा. शेळके सरांविषयीचे आदरभाव आणि आठवणी शब्दबद्ध केल्या.

विष्णु बचाटे सर यांच्या प्रभावी सूत्रसंचालनामुळे वातावरण भारून गेले. कार्यक्रमाच्या अखेरीस दिपक ठोकरे सर यांनी आभार प्रदर्शन केले.

**माजी विद्यार्थ्यांचा आत्मीय सहभाग**

कार्यक्रमामध्ये विविध क्षेत्रात यशस्वी वाटचाल करणारे माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपल्या गुरूंच्या सन्मानासाठी त्यांनी निस्सीम मेहनत घेतली. सत्कार समितीचे नियोजन, सजावट, आणि अतिथी सेवा यामध्ये माजी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग भावूक करणारा होता.

**एक शिक्षक, एक युग, एक सन्मान**

हा कार्यक्रम केवळ एका शिक्षकाचा सत्कार नव्हता हा होता 'गुरू' या नात्याचा सन्मान, एका युगाचा निरोप, आणि कृतज्ञतेचा साक्षात उत्सव.

वक्त्यांच्या शब्दांतून उमटलेले शिक्षकांचे महात्म्य, उपस्थितांचे अश्रूंनी भरलेले डोळे, आणि शेवटच्या क्षणापर्यंत ऐकू येणारी "धन्यवाद, गुरूजी..." ही साद हे सारे क्षण नायगांव दत्तापुरच्या इतिहासात अविस्मरणीय ठरले.

# नारायणराव नागरे महाविद्यालयात स्वयंशासित दिनानिमित्त सहभागी विद्यार्थ्यांचा सत्कार

**दैनिक आपला विदर्भ**

**■ देवानंद सानप**

**बिबी:** स्थानिक दुसरबीड येथील नारायणराव नागरे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शिक्षक दिन साजरा करण्यात आला. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या जयंतीनिमित्त स्वयंशासन दिन म्हणून शिक्षक दिन साजरा केला जातो या स्वयंशाची शिक्षक दिनामध्ये विद्यार्थ्यांनी - प्राचार्य शिक्षक क्लार्क शिपाई या भूमिकेमध्ये भाग घेऊन उत्साहात आपल्याकडे असलेली जबाबदारी उत्स्फूर्तपणे बजावली. संस्थेच्या वतीने व महाविद्यालयाच्या वतीने सहभागी विद्यार्थ्यांचा पुष्प व शालेय उपयोगाकरिता पृष्ठ (रायटिंग पॅड) देऊन त्यांचा सन्मान करण्यात



आला. तसेचआमच्या महाविद्यालयातील तासिका तत्त्वावरील प्रा. राम पोखरकर यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाची प्राध्यापक पात्रता परीक्षा CSIR-UGC-NET-JRF in Physical Science) उत्तीर्ण केल्याबद्दल त्यांचाही शाल व पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. विजय नागरे (अधिसभा सदस्य व व्यवस्थापन परिषद सदस्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती) तसेच प्रमुख उपस्थिती प्रा.सौ धनश्रीताई कायंदे व प्रा. राम पोखरकर यांच्याहस्ते परीक्षा पॅड चे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. दीपक देशमाने यांनी केले या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. मिलिंद गवई प्रा. नयना गवारे प्रा.गणेश घुगे प्रा.सत्यम श्रीवास्तव प्रा.भगवान शिंदे प्रा. सुधाकर तारे प्रा. शंकर महेर प्रा. देवानंद नागरे प्रा. युनुस शेख श्री गजानन मुंडे अनिल रनमळे या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अहान पांडे आणि अनित पड्डा स्टारर सैयारा होईल या दिवशी ओटीटीवर प्रदर्शित

**मुंबई/प्रतिनिधी:** मोहित सुरी यांचा चित्रपट ओटीटीवर आता प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. अहान पांडे आणि अनीत पड्डा स्टारर सैयारानं बॉक्स ऑफिसवर धमाकेदार कमाई केल्यानंतर ओटीटीवर धमाका करण्यासाठी सज्ज आहे. आता हा चित्रपट प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यासाठी ओटीटीवर रिलीज होणार आहे. सैयारा चित्रपटाच्या कथेनं आणि संगीतानं प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. या चित्रपटानं रेकॉर्डब्रेक कलेक्शन बॉक्स ऑफिसवर केलं आहे. ५० दिवस थिएटरमध्ये चालल्यानंतर हा चित्रपट ओटीटीवर प्रेक्षकांना पाहायला मिळेल. हा चित्रपट ओटीटीवर कधी आणि कुठे तुम्ही पाहू शकता याबद्दल आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.

सैयारा ओटीटीवर कधी आणि कुठे प्रदर्शित होईल? : यशराज फिल्म्सचा रोमँटिक ड्रामा सैयारा १८ जुलै २०२५ रोजी रुपेरी पडद्यावर रिलीज झाला होता. हा चित्रपट अनेकांना खूप आवडला. या चित्रपटामुळं अहान पांडे आणि अनीत पड्डा हे रातोरात स्टार बनवले. तसेच निर्मात्याच्या देखील खूप फायदा झाला. आता सैयारा १२ सप्टेंबर २०२५ रोजी ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होत आहे. दरम्यान या चित्रपटानं जगभरात ५७६ कोटी रुपये कलेक्शन केलंय. सैयारानं भारतात ३३७.४५ कोटी रुपये कलेक्शन केलं असून हा चित्रपट वर्षातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक कमाई करणारा ठरला आहे. या चित्रपटामधील प्रेमकहाणी खूप धमाकेदार आहे. या चित्रपटामध्ये प्रेक्षकांना खूप काही विशेष पाहायला मिळणार आहे.

# अंतिम प्रेषित मुहम्मद सल्लम यांना २०१ हिंदू-मुस्लिम बांधवांतर्फे रक्तदान करून खरी आदरांजली!

- दिग्रस येथे ईदे मिलादनिमित्त आयोजन
- हभप मधुकरराव खोडे महारांच्या हस्ते उद्घाटन
- महिला व जोडपिंचाही प्रथमच उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक आपला विदर्भ**

**■ अयाज काजी**

**यवतमाळ** : दिग्रस येथे ईद-ए-मिलादनिमित्त तब्बल २०१ हिंदू-मुस्लीम बांधवांनी स्वेच्छेने रक्तदान करून अंतिम प्रेषित मुहम्मद सल्लम यांना अपेक्षित व अभिप्रेत, अशी अभिनव व खरी आदरांजली वाहिली. हभप मधुकरराव खोडे महाराज यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले असून यावेळी राष्ट्रीय ऐक्याचे कृतीपूर्ण दर्शन घडले.

दिग्रस येथील डॉ एपीजे अब्दुल कलाम फोरम, गोदावरी मल्टिस्टेट अर्बन बँक, सफिया-रहेमान सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक संस्था, दिग्रस तालुका पत्रकार संघटनेच्या वतीने स्थानिक ग्रामीण रुग्णालयात सदर पाचव्या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात मुस्लिमांसह इतर धर्मीय-बांधवांनी स्वेच्छेने रक्तदान करून राष्ट्रीय ऐक्याचे कृतिपूर्ण दर्शन घडविले.

मुस्लिमांसह पोलीस उपनिरीक्षक राजेश लाखकर, मराठा महासंघाचे अध्यक्ष दिलीप महिपाल, विद्यनिकेतन इंग्लिश स्कूलचे प्राचार्य निवृत्ती ढोडरे, जिल्हा परिषद शाळा सावंगाचे मुख्याध्यापक गुलाब जगताप, आरोग्य विभागाचे डॉ कपिल मुनेश्वर, एस टी महामंडळाचे चंदन देविदास आडे, होमराज जाधव, पत्रकार किशोर कदम , गोदावरी बँकेचे अमोल बोंडगे, क्रीडा शिक्षक आशिष अगलदरे, अनिल किसनराव नवघरे, किशोर अमरसिंग जाधव, रोहन नारायण जाधव, संजय रामराव मुन्नारवार, पुरुषोत्तम नारायण पंडितकर, विजय मधुकर अंबुरे, धीरज गोविंदराव ठाकरेसह अंजुम परवीन अतिक शेख, माहलेका सय्यद राहील या जोडप्याने तर तब्बसुम परवीन मुख्तार खान, सूफिया परसुवाले, रेश्मा आसिफ इसानी, गुलानाज शेख नाजीम तसेच सुमैया परवीन सैय्यद इरफान या महिलांनीसुद्धा रक्तदान करून सर्वांना प्रोत्साहित केले. सर्व २०१ रक्तदात्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. उद्घाटनीय



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आमीन चौहान यांनी, तर मजहर अहेमद खान यांनी आभार प्रदर्शन केले.

यवतमाळ-वाशीमचे खा संजय देशमुख, तहसीलदार मयूर राऊत, पोलीस निरीक्षक वैजनाथ मुंडे, उपनिरीक्षक राजेश लाखकर, निवृत्त जिल्हा न्यायाधीश डॉ संतोष जयस्वाल, आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू प्यारेलाल पवार, श्रीचंद राठोड, ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ विरेंद्र अस्वार, वैद्यकीय अधिकारी डॉ संजय जाधव, डॉ मनीषा कुमटे, शिंदे-शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख राजकुमार वानखडे, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रा प्रेम राठोड, जिल्हा नियोजन समिती सदस्य सुधीर देशमुख, भाजपचे पुसद जिल्हा उपाध्यक्ष डॉ विवेक भास्करवार, प्रमोद बनगीनवार, सुभाष कटेकर, निवृत्त शिक्षणाधिकारी प्रमोद सूर्यवंशी व डॉ वाल्मिक इंगोले, श्री बालाजी अर्बन बँकेचे अध्यक्ष राहुल शिंदे, उबाठा-सेनेचे तालुकाध्यक्ष रवींद्र अरगडे, शहराध्यक्ष राहुल देशपांडे, अजिंक्य मात्रे, स्वप्नील दुधे, हर्षिल शाह, बाबूसिंग जाधव, एल पी राठोड, पालकमंत्री संजय राठोड यांचे स्वीयसहायक अमोल राठोड, प्रा सुधीर पथक, आर्यवैश्य समाजाचे तालुकाध्यक्ष सचिन बनगीनवार, भारत देशमुख, महाराष्ट्र बांबू मिशनचे सदस्य डॉ मनोज टेवरे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ रविकिरण पंडीत व प्रा डॉ रुपेश कन्हाडे, प्रा डॉ ए डी जाधव, तेली समाजाचे तालुकाध्यक्ष संजीव चोपडे, ऍड सुधाकर जाधव, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे किशोर कदम, निवृत्त प्राचार्य जयवंत लेढे, शंकर भगत, किरण बारशे, अस्थिरोग तज्ञ डॉ पवन जाधव, शिक्षक कृती समितीचे तालुकाध्यक्ष पुंडलिक उबाळे, सदानंद आठवले, ऍड अनिल झाडे, दीपक फिसके, गोपाल शाह, विनायक दुधे आदी सर्वपक्षीय व सर्वधर्मीय बांधवानी रक्तदान शिबीराला सदिच्छा भेट देऊन आयोजक व रक्तदात्यांचे अभिनंदन व कौतुक करत सदर उपक्रमाची प्रशंसा केली

यवतमाळ येथील श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रक्तपेढी विभागाचे रक्तसंक्रमण अधिकारी डॉ अभिजित कपिले, समाजसेवा अधीक्षक आशिष दहापुते, अधिपरिचारक विजय कुर्हे व अमोल जाधव, अनिल राठोड, पूर्वेश इजगमवार, सचिन तिडके, राधिका आवारी, श्रुती लोहकरे, आंचल देवतळे, प्रणाली मुनेश्वर, संकेत ढोरे, वाहन चालक विकास जाधवसह डॉ एपीजेअब्दुल कलाम फोरम, गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी, सफिया-रहेमान सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक संस्था, दिग्रस तालुका पत्रकार संघटनेच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### जागतिक कौशल्य स्पर्धा नामांकनासाठी स्किल कॉम्पीटीशन, तरुणांना कौशल्य सादर करण्याची संधी ; ३० सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन नोंदणीचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** जगातील सर्वांत मोठी व्यवसायिक शिक्षण व कौशल्य उत्कृष्टता स्पर्धा दर दोन वर्षांनी घेण्यात येत असून ही जागतिक कौशल्य स्पर्धा सन २०२६ मध्ये शांघाई, चीन येथे आयोजित करण्यात येणार आहे. या स्पर्धेत २३ वर्षाखालील तरुणांना आपली कौशल्ये सादर करण्याची संधी असून तरुणांनी या स्पर्धेत सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यासाठी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, सेक्टर स्किल कॉन्सील तसेच विविध औद्योगिक आस्थापनांच्या सहकार्याने ६३ विविध क्षेत्रांमध्ये जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर स्किल कॉम्पीटीशनचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांमधून निवड झालेल्या उमेदवारांची नावे देशपातळीवरून जागतिक नामांकनासाठी पाठविण्यात येणार आहेत. या स्पर्धेत सहभागासाठी वयोमर्यादा हा एकमेव निकष असून ५० क्षेत्रांसाठी उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००४ किंवा नंतरचा असणे आवश्यक आहे. तर १३ विशेष क्षेत्रांसाठी उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००१ किंवा नंतरचा असणे गरजेचे आहे. इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी skillindiadigital.gov.in या संकेतस्थळावर भेट देऊन ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त गणेश बिटोडे यांनी केले आहे.

------------------



शेगाव येथील टावरी परिवाराकडून मरणोत्तर नेत्रदान

------------------

### लाल किल्ल्याच्या परिसरातून १ कोटींचा सोन्याचा कलश नेणाऱ्या आरोपीला अटक; कशी केली चोरी?

**नवी दिल्ली :** हिऱ्यांनी मढविलेला १ कोटींचा सोन्याचा कलश लाल किल्ल्याच्या परिसरातून चोरून नेणाऱ्या आरोपीला दिल्ली गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक किली आहे. जैन बांधवांच्या धार्मिक कार्यक्रमानंतर सोन्याच्या कलशची चोरी झाली होती. दिल्ली पोलिसांनी आरोपीला अटक केल्याची पुष्टी दिली आहे. मात्र, आरोपीची चौकशी झाल्यानंतर अधिक माहिती मिळू शकेल, असे पोलिसांनी सांगितलं. भारत भूषण असे आरोपीचं नाव आहे.



लाल किल्ल्याच्या समोर १५ ऑगस्टला जैन बांधवांनी दशलक्षण महापर्वाचं आयोजन केलं होतं. येथील दहा दिवसांच्या कार्यक्रमात लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यासारख्या दिग्गज नेत्यांनीदेखील सहभाग नोंदविला होता. या कार्यक्रमातून १ कोटींच्या कलशाची चोरी झाल्यानं ऐतिहासिक वारसा असलेल्या लाल किल्ल्याजवळ सुरक्षा व्यवस्थेत त्रुटी असल्याच दिसून आलं होतं. चोरीच्या घटनेनंतर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज पाहून तपासाला सुरुवात केली. सीसीटीव्ही फुटेज पाहिलं असता आरोपी हा जैन साधुंच्या वेशात धार्मिक कार्यक्रमात वावरताना दिसून आला. आरोपी हा १५० ग्रॅम हिरे, माणिक आणि पाचू जडवलेले ७६० ग्रॅम सोन्याचा कलश असलेली बॅग आणि इतर मौल्यवान वस्तू घेऊन पळाला होता.

व्यापाऱ्याचा होता कलश- सोन्याचा कलश दिल्लीतील व्यापारी सुधीर कुमार जैन यांच्या मालकीचा होता. त्यांनी सांगितलं, हा कलश त्यांच्या कुटुंबाकडं अनेक पिढ्यानपिढ्यापासून आहे. कलश चोरीची घटना ३ सप्टेंबरला सकाळी ९:२६ च्या सुमारास घडली. तेव्हा लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यासह मान्यवर हे जैन संतांचे स्टेजवर आशीर्वाद घेत होते. पोलीस सूत्रांनी सांगितलं, संशयिताची कॅमेऱ्यात स्पष्टपणे हालचाल कैद झाली होती. त्यावरून आरोपीला ओळखून त्याला अटक करण्यात मदत झाली. आरोपीला लवकरच न्यायालयात हजर केले जाईल.

कलशही जप्त - दिल्ली पोलीस आणि गुन्हे शाखेने वैशाली कॉलनीत छापा टाकून भारत भूषणला अटक केली. भारत भूषण हा दिल्लीत एका व्यावसायिकाकडे ड्रायव्हर म्हणून काम करत असल्याची माहिती समोर आली आहे. भारत भूषणच्या ताब्यातून एक कलशही जप्त करण्यात आला आहे. लाल किल्ल्याच्या परिसरात कडेकोट बंदोबस्त असताना आणि व्हीआयपींची उपस्थिती असलेल्या कार्यक्रमात मोठी चोरी झाल्यानं खळबळ उडाली होती. आरोपी अटक झाल्यानं आयोजकांना दिलासा मिळाला आहे.

# दिग्रस येथील हिंदू-मुस्लीम ऐक्य इतर गाव-शहरांसाठी आदर्शवत व प्रेरणादायी- तहसीलदार मयूर राऊत

## दिग्रस येथे गणेश विसर्जन उत्साह शांततेत

दैनिक आपला विदर्भ

■ अयाज काजी

**यवतमाळ :** दिग्रस शहरातील हिंदू-मुस्लीम ऐक्य खरोखरच इतर सर्व गावे व शहरांसाठी आदर्शवत व प्रेरणादायी आहे. सण-उत्सवांचा अर्थच सर्वांनी आपले सुखदुःख, हेवेदावे, मनातील कटुता व द्वेश बाजूला सारून एकत्रित येणे आहे. त्याचा मूर्तीमंत व कृतीपूर्ण उदाहरण प्रत्येक सण-उत्सवाच्या वेळी येथे पहावयास व प्रत्यक्ष अनुभवयास मिळत असून येथील प्रत्येक नागरिक अभिनंदनास पात्र आहे, असे मत तहसीलदार मयूर राऊत यांनी व्यक्त केले.

दिग्रस येथील श्री गणेश मंदिरात काल ता ६ रात्री बारा वाजता ते अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना बोलत होते. पोलीस निरीक्षक वैजनाथ मुंडे, मुख्याधिकारी अतुल पंत, पोलीस उपनिरीक्षक अमोल गुंडे, महावितरणचे सहायक अभियंता राहुल बालपांडे, सहायक पोलीस निरीक्षक किशोर मुरकुटे, पोलीस उपनिरीक्षक राजेश लाखकर, माजी नगराध्यक्ष व उबाठा-सेनेचे तालुकाध्यक्ष रविंद्र अरगडे, माजी नगराध्यक्ष शाम पाटील, माजी नगराध्यक्ष नूर मुहम्मद खान, माजी उपनगराध्यक्ष जावेद पटेल, तेली समाज संघटनेचे तालुकाध्यक्ष संजीव चोपडे, भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सरचिटणीस प्रमोद बनगीनवार, आर्यवैश्य समाज संघटनेचे तालुकाध्यक्ष संदीप बनगीनवार, भाजपचे माजी तालुकाध्यक्ष सुभाष कटेकर आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

दिग्रस शहराच्या प्राचीन परंपरेनुसार गणेश विसर्जनानंतर येथील श्री गणेश मंदिरात अधिकाऱ्यांच्या हस्ते सर्वप्रथम आरती करण्यात आली. तद्नंतर प्रमोद बनगीनवार यांनी दहा दिवसीय गणेशोत्सवाच्या आयोजन, तयारी व प्रशासनाच्या तत्पर सेवेविषयी आपल्या प्रास्ताविकामधून विस्तृत माहिती दिली. माजी नगराध्यक्ष रवींद्र अरगडे, माजी उपनगराध्यक्ष जावेद



पटेल, मुख्याधिकारी अतुल पंत, महावितरणचे सहायक अभियंता राहुल बालपांडे आदींनी यावेळी आपले विचार मांडले. मजहर अहेमद खान यांनी सूत्रसंचालन केले, तर पोलीस निरीक्षक वैजनाथ मुंडे यांनी आभार प्रदर्शन केले.

सामाजिक कार्यकर्ते गोपाल शाह, हनुमान रामावत, सुधीर अडकीने, स्वप्नील दुधे, राहुल गाडे, विनायक दुध, गणेश मालाधरी, उत्तम नरडे, सागर शेळके, पत्रकार अरुण इंगोले, किशोर कांबळे, अशोक जाधव, अब्दुल रफीक शेख, अमीन कलरवाले, कुणाल पाटील, अब्दुल नासिर, आनंद सारसर, शेख जावेद , सौरभ टाकसह तहसील, नगरपालिका, पोलीस विभागातील इतर अधिकारी, कर्मचारी, गणेश मंडळांचे अध्यक्ष, पदाधिकारी, राजकीय पुढारी, सामाजिक कार्यकर्ते, इतर गणेशभक्त व शांतता समितीचे सभासद देखील मोठया संख्येने उपस्थित होते.

दिग्रसचे तहसीलदार मयूर राऊत, ठाणेदार वैजनाथ मुंडे, मुख्याधिकारी अतुल पंत, पोलीस उपनिरीक्षक अमोल गुंडे, महावितरणचे सहायक अभियंता राहुल बालपांडे, सहायक पोलीस निरीक्षक किशोर मुरकुटे, पोलीस उपनिरीक्षक राजेश लाखकर, नगरपालिकेच्या बांधकाम विभागाचे लिपिक गोपाळ गवळे, सफाई कामगार उमाकांत पवार आदींचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. मुस्लीम समाजातर्फे माजी नगराध्यक्ष नूर मुहम्मद खान, माजी उपनगराध्यक्ष जावेद पटेल, मजहर अहेमद खान, अब्दुल रफीक शेख आदींनी विजय शर्मा महाराज यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.

दिग्रस येथील गणेशोत्सवादरम्यान मागील दहा दिवसापासून अनेक मंडळांनी विविध सामाजिक, धार्मिक व जनहितार्थ उपक्रमांचे आयोजन केले होते. काल सकाळपासून घरगुती व लहान मूर्त्यांचे विसर्जन झाले. रात्री पारंपरिक व आधुनिक वाद्यासह भव्य विसर्जन मिरवणुक काढण्यात आली होती. ''गणपती बाप्पा मोरया-पुढच्या वर्षी लवकर या'' अशा गगनभेदी नाऱ्याद्वारे गणेशभक्तांनी संपूर्ण शहर दणाणून सोडले. चोख पोलीस बंदोबस्त व उत्साहपूर्ण वातावरणात रात्री बारा वाजता विसर्जन पार पडले.

## सुलतानपूरमध्ये गट क्र. ८८५ वरील शेतजमिनीच्या न्यायहक्कासाठी प्राणांतिक आमरण उपोषण




दैनिक आपला विदर्भ

■ अबुतालीब खान

**सुलतानपूर :** लोणार तालुक्यातील मौजे सुलतानपूर येथील गट क्रमांक ८८५ या सुपीक व पेरणीयोग्य शेतजमिनीवर उभारण्यात येणाऱ्या प्रस्तावित योग व आयुर्वेदिक रुग्णालयाच्या विरोधात आज दिनांक ८ सप्टेंबर २०२५ रोजी, सोमवारी दुपारी १२ वाजल्यापासून शेतकऱ्यांनी प्राणांतिक आमरण उपोषण सुरू केले आहे. नागवंशी सामाजिक संघटनेच्या वतीने हे उपोषण करण्यात येत असून, संघटनेचे संघपाल बबन ज्ञानू पनाड यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू आहे.

गेल्या ५०-६० वर्षांपासून सदर गटातील जमीन ही शेतकरी वर्गाने पेरणीयोग्य बनवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह साधत आहे. मात्र, शासनाने ही जमीन पडीत दाखवून योग व आयुर्वेदिक रुग्णालयासाठी वापरण्याचा निर्णय घेतल्यामुळे स्थानिक शेतकरी संतप्त झाले आहेत.

उपोषणकर्त्यांनी पुढील प्रमुख मागण्या मांडल्या आहेत:

१. गट क्रमांक ८८५ वरील सुपीक शेतजमिनीऐवजी रुग्णालयासाठी सुलतानपूर शिवारातील पडीत व नापीक जमीन वापरण्यात यावी.

२. १९९० पूर्वीच्या पावत्या व पुरावे आमच्याकडे असूनही भाडेपट्टा नाकारला गेला आहे. आम्हाला कायद्यानुसार भाडेपट्टा मंजूर करून सातबारा आमच्या नावावर करून घ्यावा.

३. सदर जमीन पडीत असल्याचा खोटा अहवाल सादर करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर बडतर्फी व फौजदारी कारवाई करण्यात यावी.

या उपोषणात बबन ज्ञानू पनाड, हसन खा मेहताब खा, राजहंस रामेश्वर जावळे, शुभम संजय पनाड इत्यादी शेतकरी सहभागी झाले आहेत.

स्थानिक प्रशासनाने या मागण्यांची दखल घेऊन त्वरित कारवाई करावी, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

### कांदिवलीत प्रॉपर्टीच्या वादातून फ्री स्टाईल हाणामारी; बॅट, हॉकी स्टिक, काठ्या घेऊन दोन कुटुंब भिडले, एका वृद्धाचा मृत्यू, आठ गंभीर जखमी

**मुंबई/प्रतिनिधी:** मुंबईतील कांदिवली पश्चिम परिसरात प्रॉपर्टीच्या वादातून दोन कुटुंबांमध्ये तुफान हाणामारी झाली. लालजीपाडा येथील यादव आणि चव्हाण कुटुंबीयांमध्ये जागेच्या ताब्यासंदर्भातील वाद इतका वाढला की, त्याचे पर्यवसान हिंसक संघर्षात झाले. या मारामारीत एक ६५ वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाला असून, आठ जण गंभीर जखमी झाले आहेत. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार यादव आणि चव्हाण कुटुंबीयांमध्ये गेल्या काही महिन्यांपासून प्रॉपर्टीवरून वाद सुरू होता. या वादातूनच दोन्ही कुटुंबात तुंबळ हाणामारी झाली. या हाणामारीमध्ये बॅट, हॉकी स्टिक, लाकडी काठ्या, विटा आणि दगडांचा वापर करण्यात आला.

## ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त डोणगाव येथे शांततेत निघालेला भव्य जुलूस सर्वधर्म समभावाचा दिला सकारात्मक संदेश

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी:** ईद-ए-मिलादुन्नबीचया पावन निमित्ताने डोणगाव येथील मुस्लिम बांधवांच्या वतीने आज प्रभातफेरी मार्गे भव्य आणि शिस्तबद्ध जुलूस काढण्यात आला. या जुलूसामध्ये गावातील विविध समाजघटकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून सर्वधर्म समभावाचा उत्कृष्ट आदर्श प्रस्तुत केला. या निमित्ताने पंकज पळसकर आणि गोपाल सुभाषराव आखाडे यांच्या वतीने २१ बॉक्स पाणी बाटल्यांचे मोफत वाटप करण्यात आले. हे वाटप केवळ मदतीसाठी नव्हे, तर सामाजिक ऐक्य आणि माणुसकी जपण्यासाठी केले गेले, असे स्पष्ट होते.





या शांततेत पार पडलेल्या जुलूसदरम्यान डोणगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार अमरनाथ नागरे सर आणि त्यांचे सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कायदा व सुव्यवस्थेचा आदर्श ठेवल्याबद्दल गावकऱ्यांनी त्यांचे आभार मानले.

विशेष म्हणजे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष यांनी या उपक्रमाद्वारे सर्वधर्म समभाव आणि सामाजिक ऐक्याचा सकारात्मक संदेश दिला. त्यांच्या पुढाकारामुळे विविध धर्मीय नागरिक एकत्र आले आणि एकात्मतेचा हा सोहळा अधिकच भावनिक व प्रेरणादायी ठरला.

ईद-ए-मिलादुन्नबीचा सण हा केवळ मुस्लिम बांधवांसाठी नव्हे, तर माणुसकी, प्रेम, शांतता आणि एकोपा यांचे मूल्य जपणाऱ्या प्रत्येकासाठी एक प्रेरणा आहे, हे या कार्यक्रमाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

# शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे शिल्पकार आहेत : प्राचार्य डॉ. विजय नागरे

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** सिंदखेड राजा तालुक्यातील दुसरबीड येथील नारायणराव नागरे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वपल्ली डॉ. राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी शिक्षक दिन स्वयंशासन दिन म्हणून पाळला जातो. यानिमित्ताने विद्यार्थ्यांनी प्राचार्य, प्राध्यापक, लिपिक, शिपाई आदींच्या भूमिकेत काम करून आपल्याकडे असलेली जबाबदारी उत्स्फूर्तपणे पार पाडली. कार्यक्रमात सहभागी विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ व शालेय उपयोगी रायटिंग पॅड देऊन सन्मान करण्यात आला.

तसेच महाविद्यालयातील तासिका तत्त्वावरील प्राध्यापक राम पोखरकर यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाची प्राध्यापक पात्रता परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल त्यांचा शाल व पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय नागरे (अधिसभा सदस्य व व्यवस्थापन परिषद सदस्य) होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. सौ. धनश्री कायंदे व प्रा. राम पोखरकर उपस्थित होते. त्यांच्याहस्ते विद्यार्थ्यांना परीक्षा पॅडचे वितरण करण्यात आले.



या प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. विजय नागरे म्हणाले की, ''शिक्षक हे केवळ ज्ञानदाते नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे शिल्पकार असतात. शिक्षकांच्या मार्गदर्शनानेच विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल घडते. स्वयंशासन दिनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भूमिका पार पाडून जबाबदारीची जाणीव करून दिली आहे, ही अभिमानास्पद बाब आहे. आजचा दिवस आपल्याला आदर्श शिक्षक सर्वपल्ली डॉ. राधाकृष्णन यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवण्याची संधी देतो.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. दीपक देशमाने यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. मिलिंद गवई, प्रा. नयना गवारे, प्रा. गणेश घुगे, प्रा. सत्यम श्रीवास्तव, प्रा. भगवान शिंदे, प्रा. सुधाकर तारे, प्रा. शंकर महेर, प्रा. देवानंद नागरे, प्रा. युनुस शेख, श्री. गजानन मुंडे व श्री. अनिल रनमळे यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी-विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजलक्ष्मी अर्बन महिला पतसंस्थेचे भव्य उद्घाटन

## केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांची उपस्थिती





**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/कार्यालय प्रतिनिधी:** बुलढाणा महिला बचत गटांच्या आर्थिक सक्षमीकरणातून विकसित झालेल्या 'राजलक्ष्मी अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी'चे उद्धाटन नुकतेच केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार), आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. ''सहकार हा महाराष्ट्राच्या प्रगतीचा आत्मा आहे. महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी राजलक्ष्मी अर्बन एक आदर्श ठरेल,'' असा विश्वास त्यांनी आपल्या भाषणात व्यक्त केला.

**उद्घाटन सोहळा आणि प्रमुख उपस्थिती**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार संजय गायकवाड होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून बुलढाणा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक, भाजपाचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार विजयराव शिंदे, शेतकरी नेते रविकांत तुपकर, तसेच श्री सौभागे सर, विजय टेकाळे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

**पतसंस्थेचे उद्दिष्ट व कार्याची दिशा:** कार्यक्रमाच्या प्रारंभी कोषाध्यक्ष सौ. मनीषा राऊत यांनी पतसंस्थेच्या उद्देश व ध्येयधोरणांची माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात आमदार संजय गायकवाड यांनी महिला बचत गटांच्या कार्याचा गौरव करत सांगितले की, ''घर सांभाळून महिलांनी जे आर्थिक सशक्तीकरणाचे काम उभं केलं, ते कौतुकास्पद आहे.''

**मार्गदर्शन व शुभेच्छा**

राधेश्याम चांडक यांनी पतसंस्थेच्या भविष्यातील जबाबदाऱ्या स्पष्ट करताना पारदर्शकतेवर भर दिला. माजी आमदार विजयराव शिंदे यांनी महिलांच्या सामाजिक योगदानावर प्रकाश टाकला. रविकांत तुपकर यांनी महिलांच्या कार्यकुशलतेला सलाम करत संस्थेच्या यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. श्री सौभागे यांनी संचालकांनी बचत गटाच्या माध्यमातून केलेल्या कार्याचा आढावा दिला.

**उत्स्फूर्त प्रतिसाद:**

या उद्धाटन सोहळ्यास विविध क्षेत्रांतील मान्यवर, महिला बचत गटांच्या सदस्यांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**''स्त्रीशक्तीच्या सहकारमयी वाटा : राजलक्ष्मी अर्बनचा दीपस्तंभ**

''जर स्त्री सक्षम झाली, तर समाज सक्षम होतो'' ही म्हण आज राजलक्ष्मी अर्बन महिला को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीसारख्या उपक्रमांनी खरं करून दाखवली आहे. घराच्या चार भिंतीआड आपले कर्तृत्व दाखवणाऱ्या महिलांनी आता अर्थकारणाच्या मैदानातही पाय रोवले आहेत, आणि त्यातून साकार झाली आहे 'राजलक्ष्मी अर्बन' ही महिला सशक्तीकरणाची प्रेरणादायी कहाणी.

**बचतीपासून पतसंस्थेपर्यंतचा प्रवास**

सुरुवातीला बचत गटाच्या माध्यमातून सुरू झालेली एक साधीशी चळवळ, आज एका सुस्थापित पतसंस्थेमध्ये रूपांतरित झाली आहे. नियमित बचतीसह महिलांनी छोट्या कर्ज योजना, आपत्कालीन निधी, आणि व्यावसायिक पूरक निधी यांचा वापर करत आपले कुटुंब आणि उद्योग उभे केले.

**सहकारातून स्वावलंबन**

राजलक्ष्मी अर्बनने महिलांना केवळ आर्थिक मदत दिली नाही, तर आत्मविश्वास, निर्णयक्षमता, आणि नेतृत्वही दिलं. या संस्थेच्या माध्यमातून अनेक महिलांनी छोटे व्यवसाय सुरू केले आहेत शिवणकाम, किराणा दुकान, डेअरी, पापड-पोळी गृहउद्योग, व अधिक.

**प्रशासनाचा व समाजाचा पाठिंबा**

राजलक्ष्मी अर्बनचे उद्धाटन थेट केंद्रीय मंत्र्यांच्या हस्ते होणे ही केवळ प्रतिष्ठेची बाब नाही, तर महिला सहकार संस्थेच्या कामगिरीवर ठसठशीत शिक्कामोर्तब आहे. स्थानिक आमदार, सहकारी बँक अधिकारी, आणि सामाजिक कार्यकर्ते यांचे सतत मार्गदर्शन संस्थेला बळकटी देत आहे.

**भविष्यातील दिशा**

या पतसंस्थेचा पुढील टप्पा म्हणजे डिजिटायझेशन, स्वतंत्र कार्यालय, आणि जिल्हा/राज्यस्तरीय नेटवर्किंग. महिलांनी महिलांसाठी चालवलेली ही पतसंस्था भविष्यात इतर संस्थांसाठी आदर्श ठरेल, यात शंका नाही

स्त्रीशक्तीला जर संधी मिळाली, तर ती काळाचं भान ठेवून नव्या युगाचं नेतृत्व करू शकते. राजलक्ष्मी अर्बन ही त्याचीच एक ठळक उदाहरण आहे.

# पत्रकारावर खोटे आरोप, जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन, दोषींवर कारवाईची मागणी

**दैनिक आपला विदर्भ**

**ढाणकी/प्रतिनिधी:** युवा ग्रामीण पत्रकार संघ, ढाणकी यांच्या वतीने बंटी दत्तात्रय फुलकोंडवार या पत्रकारावर खोटे आरोप लावून त्याची बदनामी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. पत्रकार संरक्षण कायद्यानुसार दोषींवर दंडात्मक कारवाई करून पीडित पत्रकाराला न्याय मिळावा, अन्यथा संविधानिक मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.




# भारतीय सशस्त्र सैन्यदलातील अधिकारी पदाचे मोफत पूर्व प्रशिक्षण !

## - जिल्ह्यातील युवक-युवतींसाठी संधी - १५ सप्टेंबर रोजी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे मुलाखती

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी:** भारतीय सैन्यदल, नौदल आणि वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होऊ इच्छिणाऱ्या पात्र उमेदवारांसाठी सेवा निवड मंडळ परीक्षेच्या पूर्वतयारी प्रशिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे. महाराष्ट्रातील युवक-युवतींसाठी दि. २२ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सेवा निवड मंडळाचे कोर्स क्र. ६२ चे प्रशिक्षण हे छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे आयोजित करण्यात येणार आहे. या कोर्सदरम्यान उमेदवारांना निःशुल्क प्रशिक्षण, निवास व भोजन सुविधा दिली जाणार आहे. बुलढाणा जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी या संधीचा लाभ घेण्यासाठी १५ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, बुलढाणा येथे मुलाखतीस उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे. मुलाखतीस येताना उमेदवारांनी सैनिक कल्याण विभाग, पुणे (, ) यांच्या संकेतस्थळावरून एसएसबी-६२ कोर्ससाठीचे प्रवेशपत्र आणि परिशिष्टांची प्रिंट काढून पूर्ण भरून आणणे आवश्यक आहे. संबंधित कागदपत्रांची प्रिंट जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातूनही मिळवता येणार आहे.

**प्रवेशासाठी आवश्यक पात्रता:**

या एसएसबी वर्गामध्ये प्रवेशासाठी उमेदवारांकडे कोणतीही एक पात्रता असणे आवश्यक आहे. त्यासंबंधित मूळ प्रमाणपत्रे



सोबत आणणे बंधनकारक आहे. त्यानुसार

१. कंबाईंड डिफेनस सर्विसेस एक्झामिनेयन किंवा नॅशनल डिफेंस अकॅडमी परीक्षा उत्तीर्ण असावे व सेवा निवड मंडळाच्या मुलाखतीसाठी पात्रता मिळालेली असावी.

२. एनसीसी सर्टिफिकेट किंवा ग्रेडमध्ये पास झालेले असावेत व एनसीसी ग्रुप हेडक्वार्टरकडून एसएसबीसाठी शिफारस असणे.

३. टेक्निकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी एसएसबी मुलाखतीचे कॉल लेटर असणे.

४. विद्यापीठ प्रवेय प्रणालीसाठी एसएसबी चे कॉल लेटर किंवा शिफारस केलेल्या यादीत नाव असणे. अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक ई-मेल: training.petenashik@gmail.com दूरध्वनी क्रमांक ०२५३-२४५१०३२ किंवा ९१५६०७३३०६ या व्हाट्सॲप क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, बुलढाणा यांनी केले आहे.

# कमांडो गौतम धवने राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित होणार

**दैनिक आपला विदर्भ**

**अयाज काजी**

**यवतमाळ :** तालुक्यातील सामाजिक बांधिलकी, प्रामाणिकपणा आणि सर्वसामान्य नागरीकांना कायद्याची जनजागृती करून ते कायद्यापासून वंचित न राहावे यासाठी कार्यतत्परतेचा अविस्मरणीय ठसा उमटवणाऱ्या कमांडो गौतम धवने यांचा राज्यस्तरीय पातळीवर पूणे येथे होणाऱ्या तिसऱ्या महाधिवेशन प्रसंगी त्यांना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

ज्ञानमाता माहिती अधिकार प्रशिक्षण संस्था, पुणे ( प्रमाणित) आयोजित तिसरे राज्यस्तरीय महाधिवेशन दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ रोजी होणार असून, या महाधिवेशनात प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय पुरस्कार कमांडो गौतम धवने यांना जाहीर करण्यात आला आहे. हा मानाचा सन्मान ज्ञानमाता माहिती अधिकार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आब्राहम आढाव यांच्या हस्ते प्रदान केला जाणार असून, महाराष्ट्रातील सामाजिक व पारदर्शक कार्याला नवे प्रेरणादायी वळण देणारा




हा सोहळा ठरणार आहे. राज्यभरातील प्रसिद्ध समाजसेवक, ज्येष्ठ पत्रकार, विधिज्ञ, प्रशासकीय अधिकारी, कार्यकर्ते, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर आणि विविध जिल्ह्यांतील प्रतिनिधी या ऐतिहासिक सोहळ्याला उपस्थित राहणारआ धवने यांचा सन्मान म्हणजे महाराष्ट्रातील तरुणाईसाठी प्रेरणादायी दीपस्तंभ असेल.या राज्यस्तरीय पुरस्कारामुळे कमांडो गौतम धवने यांच्या कार्याला नवे बळ, समाजात नवी ऊर्जा आणि सामान्य नागरीकासाठी प्रेरणादायी दिशा ठरणार आहे. जाहीर केलेल्या पुरस्काराबद्दल तालुक्यातील नागरिकांकडून कमांडो गौतम धवने यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.


# मुर्तिजापूर तालुक्यात सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत रस्त्यांचे सिमांकन व अभिलेख सुधारणा कार्य सुरु

**दैनिक आपला विदर्भ**

**मुर्तिजापूर/प्रतिनिधी:** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान व ''सेवा पंधरवडा'' उपक्रमांतर्गत मुर्तिजापूर तालुक्यातील सर्व महसूल रस्त्यांचे सिमांकन, अभिलेख अद्ययावत करणे व प्रत्येक रस्त्याला विशिष्ट क्रमांक देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सुरू करण्यात आले आहे. हा उपक्रम राष्ट्रनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस (१७ सप्टेंबर) ते महात्मा गांधी जयंती (२ ऑक्टोबर) या कालावधीत राबविण्यात येत आहे.

या कार्याची अंमलबजावणी मा. उपविभागीय अधिकारी, मुर्तिजापूर यांच्या मार्गदर्शनाखाली केली जात आहे. यासाठी तालुक्यात कालबद्ध कार्यक्रम आखण्यात आला आहे.

पहिल्या टप्प्यात १० सप्टेंबर




२०२५ रोजी ४१ गावांमध्ये ग्रामसेवक, तलाठी, महसूल सेवक व पोलीस पाटील यांच्या उपस्थितीत शिवार फेरी होणार असून, प्रत्यक्ष वापरातील व नकाशावरील रस्त्यांची पाहणी करण्यात येणार आहे. यावेळी माहिती प्रपत्र-१ व २ मध्ये नोंद केली जाईल.

यानंतर १५ सप्टेंबर रोजी ग्रामसभा आयोजित करण्यात येणार असून, नागरिकांच्या हरकती व दावे नोंदवले जातील. त्यानंतर १६ व १७ सप्टेंबर रोजी भूमी अभिलेख विभाग रस्त्यांची मोजणी करून सीमा चिन्हे स्थापन करेल.

१७ ते २२ सप्टेंबरदरम्यान अतिक्रमण झालेल्या रस्त्यांसंदर्भात सुनावणी होईल व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पोलीस मदत घेतली जाईल. या प्रक्रियेनंतर अद्ययावत अभिलेख गाव दप्तरात नोंदवून प्रत्येक रस्त्याला विशिष्ट क्रमांक (कोड) देण्यात येणार आहे.

या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना शेतापर्यंत सहज पोहोचता येईल, शेतीमालाची वाहतूक सुलभ होईल, अतिक्रमण कमी होईल तसेच भावी वाद व अडचणी टाळता येतील, असा विश्वास तालुका प्रशासनाने व्यक्त केला आहे.

तालुका प्रशासनाने सर्व नागरिक व शेतकऱ्यांना या उपक्रमात सक्रीय सहभाग व सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

# अकोल्यात वंचित ने काढला एल्गार मोर्चा




**अकोला/प्रतिनिधी:** अकोल्यात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयापर्यत एल्गार मोर्चा काढण्यात आला आहे. तर जिल्हातील भूमिहीन तथा अतिक्रमणधारकांना कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेत प्राधान्याने समाविष्ट करून तालुक्यात जेथे जमीन उपलब्ध होईल तेथे प्रस्तावाला मंजुरी देऊन लाभार्थ्यांना जमिनीचे वाटप करण्यात यावे यासह विविध मागण्यांसाठी वंचित बहुजन आघाडीच्यावतीने शहरातील टॉवर चौकापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत एल्गार मोर्चा काढण्यात आला आणि जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.